RNI MAHMAR
36829-2010


ISSN - 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

## International Research Journal

UGC-CARE LISTED



# RETHINKING MAHATMA GANDHI IN PRESENT CONTEXT

February 2020

Executive Editor : Dr. Kiran Save

Co-Editor : Dr. Tanaji Pol
Prof. Anagha Deshmukh

Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**
**UGC CARE LISTED JOURNAL**
**February – 2020**

## Rethinking Mahatma Gandhi in Present

**Executive Editor**
**Dr. Kiran Save**
**Principal**
**Sonopant Dandekar Arts, V.S. Apte Commerce & M.H. Mehta Science College Palghar Dist. Palghar [M.S.] India**

**Co-Editors**
**Dr. Tanaji Pol**
**Prof. Anagha Deshmukh**

**Chief Editor**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**
**Pratik Prakashan, Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur**
**Dist. Latur- 433515, Maharashtra**

Published by – Dr. Kiran Save, Principal, Sonopant Dandekar Arts, V.S. Apte Commerce & M.H. Mehta Science College Palghar
The Editor shall not be responsible for originally and thought expressed in the papers. The authors shall be solely held responsible for the originally and thoughts expressed in their papers.

© all rights reserved with the Editors

Sonopant Dandekar Shikshan Mandali's

# Sonopant Dandekar Arts, V.S. Apte Commerce & M.H. Mehta Science College Palghar

## National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context

29th February 2020

**Convener**
**Dr. Kiran Save**
**Principal**

**Co-ordinator**
**Dr. Tanaji Pol**
**Prof. Anagha Deshmukh**



## PREFACE

It is a great honour and privilege to organize a National Conference on "Rethinking Mahatma Gandhi in Present Context" which rethinks philosophy and ideology of Mahatma Gandhi who played a significant role in shaping the future of the nation called India. Rethinking Gandhian philosophy and values in contemporary world appears apt and necessary.

On behalf of Management, I welcome you all to this institution.

I am hopeful and confident that the deliberations made in the conference will enlighten the new area among the researchers. Scholars and students.

I wish the conference a great success.

Adv. G. D. Tiwari
President
Sonopant Dandekar Shikshan Mandali's
Palghar



## FROM THE PRINCIPAL DESK

I am privileged to extend a warm welcome to you all. I am immensely happy that Department of philosophy in collaboration with other departments of Humanities of Sonopant Dandekar College has organized a National conference on "Rethinking Mahatma Gandhi in Present Context" on 29th February 2020. Organizing this conference was a great honour.

This year is the golden jubilee year of our college. Over the past fifty years, Sonopant Dandekar College has provided a cross disciplinary venue for researchers and passionate to address socially significant issues. In last few years, college has achieved excellence in the educational and social field and crossed many milestones.

This conference is being organized to commemorate the completion of 150th birth anniversary of Mahatma Gandhi. The conference aims at bringing different ideologies under one roof and provide opportunities to exchange ideas to observe the connectivity and relevance of Gandhian philosophy to contemporary global problems.

Taking this opportunity, I would like to mention proudly that our college has a foundation and tradition of Gandhian Philosophy. The former chairman and trustee of Gandhian SmarakNidhi, Mumbai and pioneer of Employment Guarantee scheme. Gandhian thinker late V.S. page was the mentor, advisor and well-wisher of this institution. Dr. Usha Mehta, next trustee and chairman of

Gandhi SmarakNidhi, Mumbai was also closely connected with our institution. Our former principal and trustee of Gandhi SmarakNidhi, Mumbai, who himself was an ardent follower of Gandhians principles, late Dr. L.B. Mantri gave the framework of Gandhians values to college administration. Our Hon. President Adv. G.D Tiwari is also a staunch Gandhians and acolyte of his philosophy.

My regards to Dr. Kumar Saptarshi , Chairman Maharashtra Gandhi SmarkNidhi , Dr. T.S Girishkumar, Member Indian council of philosophical Research and Mr. Chandrakant Wankhede, a well-known senior journalist for their valuable guidance.

Organizing such a conference relies on the contribution of colleagues from all departments and students volunteers. I would like to acknowledge the efforts of our TEAM DANDEKAR for their assistance in successful conduction the conference.

I express my sincere gratitude towards Adv. G. D. Tiwari, President, Sonopant Dandekar Shikshan Mandali for his vision, motivation and unshakable support, I am very thankful to Shri. Chandrakant Dandekar and Shri. Sunil Chitre, Vice President, Sonopant Dandekar Shikshan Mandali, Prof. Ashok Thakur and Shri. Atul Dandekar Secretary, Shri. Jayant Dandekar, Joint Secretary for their guidance and support in organizing this National conference.

Dr. Kiran Save
Principal
Sonopant Dandekar Arts.
V.S. Apte Commerce &
M.H. Mehta Science College Palghar

# Index


| अ.क्र | पेपरचे नाव | लेखकाचे नाव | पेज नं. |
|---|---|---|---|
| १ | महात्मा गांांधीजीांच्या धममविषयक विचाराांची प्रस्तूतता | संतोष बुधाजी भावार्थे | १ . ७ |
| २ | प्रचलित संदर्भात गांधी विचारांचे महत्व | डॉ. किरण जयदेव सावे | ८ . १५ |
| ३ | गांधीजी आणि श्रीमद्वगतगीता | डॉ. सचिन खोकले | १६ . १८ |
| ४ | "अहिंसातत्वज्ञानाचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास " | प्रा. विनोद संभाजी सोनावने | १९ . २६ |
| ५ | आज गरज महात्मा गांधीजीच्या अर्थकारणाची | डॉ. हनुमंत कुरकुटे | २७ . ३५ |
| ६ | महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांची समर्पकता | प्रा. धनेश मधुकर हरड | ३६ . ४२ |
| ७ | कृषी विकासात महात्मा गांधीजीच्या विचारांचे योगदान | प्रा. कांतीलाल शंकर पाटील | ४३ . ५१ |
| ८ | महात्मा गांधी यांच्या सर्वधर्मसमभाव विचारांची प्रांसंगिकता | डॉ. माधव नरहरी कांबळे | ५२ . ५६ |
| १० | महात्मा गांधी आदर्श ग्राम संकल्पना | प्रा.प्रकाश विष्णू घरत | ५७ . ६१ |
| ११ | २१ व्या शतकात महात्मा गांधीजीच्य 'सत्याग्रह'तत्वज्ञानाचे महत्व | प्रा.प्रेरणा राउत | ६२. ६४ |
| १२ | गांधी आंबेडकर महासमन्वय : काळाची गरज | डॉ. राहुल हांडें | ६५ . ६७ |
| १३ | गांधीजींचे स्त्री विचार | प्रा. रामदास येडे | ६८ . ७० |
| १४ | महात्मा गांधीजीच्या अहिंसा तत्वाचा प्रभाव | प्रा. रोहीत गायकवाड | ७१ . ८१ |
| १५ | महात्मा गांधीजीच्या विचारांचा शिक्षणमहर्षी कर्मवीर भाउराव पाटील यांच्या कार्यावर पडलेला प्रभाव: एक चिंतन | प्रा. सुनीलदत्त गोडसे | ८२. ८४ |

Akshar Wangmay (International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

# प्रचलित संदर्भात गांधी विचारांचे महत्व

**डॉ. किरण जयदेव सावे**
प्राचार्य
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर,
ईमेल–asthakiran@rediffmail.com

**प्रास्ताविक :**

आज जग विनाशाच्या उंबरठयावर उभे आहे. दूषित पर्यावरण, मानसिक तणाव, सत्तास्पर्धा, हिंसाचार अशा अनेक समस्यांनी संपूर्ण जग ग्रासले आहे. संपत्तीचा अवाजवी लोभ, परस्परांचा द्वेष, आर्थिक शोषण, अतिरेकी मानवी हस्तक्षेपामुळे निर्माण झालेला निसर्गाचा असमतोल इ. घटक त्यास कारणीभूत आहेत. यावर वेळीच तोडगा काढला नाही, तर संपूर्ण जग विनाशाच्या खाईत लोटले जाईल. गांधी विचारांचा स्वीकार करणे हाच त्यावरील एकमेव समर्थ पर्याय आहे. गांधीजींच्या विचारांची कास धरल्याशिवाय जगाला पर्याय नाही.

**प्रचलित संदर्भात गांधी विचारांचे महत्व :**

आज पूर्ण जग हिंसाचार, भ्रष्टाचार, स्वैराचार यांच्या जंजाळात पूर्णपणे फसले आहे. या जंजाळातून बाहेर पडायचे असेल तर गांधी विचारांची कास धरण्याशिवाय पर्याय नाही. सत्याचा, अहिंसेचा व अपरिग्रहाचा जो मार्ग गांधीजींनी सांगितला होता तोच मार्ग योग्य आहे व त्या मार्गाचे अनुसरुण केले तरच मानवजात वाचेल.

वर्तमानाचा विचार करता असे दिसून येते की, आज सगळे जग वेगाने भोगवादाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. हिंसा, भ्रष्टाचार, लाचलूचपत या सर्वांचा सर्व जगभर इतका ऊत आला आहे की सामान्य माणसाचीच काय, पण भल्या–भल्या लोकांची मती गुंग झाली आहे. जीवन व्यवहाराच्या सर्व पध्दतीवर राजकारणाचा जबरदस्त पगडा असून या सर्व स्थितीतून शांततापूर्ण व निरामय जगण्याचा रस्ता कसा काढावा याविषयी जगातील अनेक विचारवंत संभ्रमात आहेत.

Akshar Wangmay (International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

विकसित राष्ट्रांच्या युध्दखोरीमुळे विनाशकारी शस्त्रांची निरंतर निर्मिती होत असून सगळी मानवजातच नष्ट होईल की काय अशी भीती वाटायला लागली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जगभर जे जाळे पसरले आहे त्यामुळे आता प्रत्यक्ष युध्दाने कुठल्याही दुर्बल राष्ट्राला गुलाम बनविण्याची गरज राहिली नाही. आर्थिक नाडया आवळल्या की राष्ट्रे आपोआपच गुलाम होतात. ही जीवघेणी अर्थव्यवस्था बदलण्याची इच्छा असली तरी अनेक देश ते करु शकत नाहीत. जे बलवान देश आहेत ते अर्थसत्ता व राजसत्ता दोघांवरही काबू करु इच्छितात. एकमेकांना पूरक असणाऱ्या या सत्ता शोषणाचे वेगवेगळे मार्ग शोधून काढतात.

सांप्रदायिकता, गरिबी, चारित्र्यहीनता, स्त्रियांवरचे अत्याचार, बालमजुरांचे शोषण, समाजाल्या प्रत्येक गटाचे दुसऱ्या गटापासून वाढणारे अंतर, भाषा, सीमा, पाणी यांवरुन होणारे प्रांतीयझगडे, इत्यादींनी सर्वसामान्य जनता ही गांजली आहे.

विनाशाच्या अगदी मुखावर उभ्या असलेल्या या जगाला आजही महात्मा गांधींच्या विचारांमध्ये मुक्तीची वाट आढळते. जगातल्या सत्तरापेक्षा अधिक नोबेल पुरस्कार विजेत्यांनी, गांधी विचारांनी पुढे गेलो तरच मानव जात शिल्लक राहील अशी नि:संदिग्ध ग्वाही दिली आहे. त्यामुळे आजच्या जगात गांधीजींच्या विचारांची उपयुक्तता अधिक आहे असे दिसते.

गांधीजींनी आपल्या 'हिंद स्वराज्य' या आपल्या पुस्तकात पाश्चात्त्यांच्या संस्कृतीचे वर्णन 'आसुरी' या शब्दात केले आहे. ते म्हणतात की, पाश्चात्य ''संस्कृती भौतिकवादी तर आहेच पण इंद्रियसुख हेच तिचे मुख्य ध्येय आहे. या सुखामागे वेडयासारखे धावणाऱ्या या लोकांना आयुष्यातल्या अन्य उदात्त प्रवृत्तीसाठी वेळ नाही. ते या सुखांमध्येच जीवनाची सार्थकता व पुरुषार्थ समजतात.

या युगात स्पर्धा अपरिहार्य मानली जाते. पश्चिमी जगाची इच्छा आहे की यच्चयावत मानवी जातीने या स्पर्धेत उतरावे. या स्पर्धेचा नियम एकच असतो 'मोठा मासा लहान माश्याला गिळेल.' खरे तर हा प्राणिजगताचा नियम आहे पण स्पर्धेने तो मानवी संस्कृतीवर लादला.

या उपभोगवादी संस्कृतीने सगळ्या जगाचा एक बाजार बनवला. या बाजारात प्रत्येक वस्तू विकली जाते किंवा विकत घेतली जाते. बाजारात अन्य नाती नसतात. एकच नाते असते ते म्हणजे विकणारा व विकत घेणारा. बाजाराचा उद्देश नफा कमवणे हाच असतो. हा किती आणि कसा कमवावा यावर नीतीचे कुठलेही बंधन नाही व त्यामुळे भरमसाट नफा कमविण्याच्या हव्यासापोटी जे नको तेही लोकांच्या माथी मारले जाते. कुठलीही गोष्ट विकण्याचे एक राक्षसी तंत्र या बाजारवादाला सापडले आहे.''

आताच जग चांगल्या आणि वाईट गोष्टींची एक आश्चर्यजनक सरमिसळ झाले आहे. हे आयुष्य अधिक सुंदर व्हावे असे अनेक शोध माणसाने लावले. व्यक्तीचे एकूण जीवनमान वाढले. कित्येक व्याधी समूळ नाहीशा झाल्या. जगातल्या कुठल्याही कोपऱ्यात असलेल्या व्यक्तीबरोबर त्वरित बोलता येईल याची व्यवस्था झाली. काम्प्युटर, फॅक्स, ई–मेल, सेल्युलर फोन, इत्यादी संपर्क साधनांनी प्रचंड क्रांती घडवली. जग खऱ्या अर्थाने एक खेडे झाले. रस्त्यावर चालणे जितके सोपे, आकाशात उडणे तितकेच सोपे झाले.

अर्थात एका बाजूला एका जगाला हे सर्व फायदे मिळत होते तर दुसऱ्या बाजूला जगाचा फार मोठा भाग अज्ञान, रोगराई, भूक, दारिद्रय यांच्याशी झुंजत आहे. पृथ्वीच्या खनिजांची भयंकर लूट चालली आहे. लहान मोठया शहरांमध्ये प्रदूषण वाढत आहे. निसर्गावरच्या, पर्यावरणावरच्या अत्याचारांनी सुनामी, वादळे, अवेळी पाऊस, नद्यांना पूर, वाढणारी वाळवंटे या सर्वांचे थैमान वाढले आहे. विकासाच्या एका आंधळया संकल्पनेने माणसातला विवेक जणू हरवूनच टाकला. मूठभर लोक फार श्रीमंत झाले व बाकीच्यांच्या वाटयाला भयानक गरिबी आली. औद्योगिकीकरणाचा राक्षस आवरता येईल की नाही, याची लोकांना चिंता पडली.

माणसाचे सगळे आयुष्य यंत्रांनी व्यापून टाकले. त्याच्या हातात व त्यामुळे मनालाही फारसे काम राहिले नाही. परिश्रम नाही. घाम गाळणे नाही, 'कष्टाची भाकर' नाही. श्रमाला प्रतिष्ठाच नसल्यामुळे श्रम करणाऱ्यांकडे तुच्छतेने पाहण्याची वृत्ती वाढली. कमीत कमी श्रम करुन अधिकात अधिक पैसा मिळविण्याची हाव वाढली.

Akshar Wangmay (International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

गांधीजींचा यंत्राला विरोध नव्हता. माणसाच्या हातातले काम काढून घेणाऱ्या यंत्राला मात्र त्यांचा विरोध होता. विज्ञान, तंत्रज्ञान, यंत्रे ही शेवटी मानवासाठी आहेत. ती जर मानवालाच निरर्थक ठरवत असतील तर ती हवीत कशाला? साधा चरखा किंवा टकळी किंवा खादी वापरण्यामागे माणूस स्वयंपूर्ण बनावा, त्याच्या हाताला काम मिळावे व मन रिकामे राहू नये याची दृष्टी होती. तंत्रज्ञानाला ही दृष्टी देता आली पाहीजे असा त्यांचा आग्रह होता.

आज भयंकर हिंसक वातावरणात जगणाऱ्या जगाला आता कुठे गांधीजींचे अहिंसेने व्यापलेले जीवन महत्वाचे आहे हे कळायला लागले. वाणी, विचार आणि वर्तन यांत पूर्णपणे अहिंसक असलेल्या गांधीजींनी राजकारणही अहिंसक पध्दतीने करता येते हे दाखवून दिले. गांधीजींमध्ये विभिन्न परस्पराविरोधी विचारांचा समन्वय घडविण्याची एक विलक्षण ताकद होती. ते एकाच वेळेला अनेक बाबींविषयी विचार करीत व त्यावर प्रत्यक्ष कार्याचा उपायही शोधून काढीत. त्यामुळे एकीकडे स्वातंत्र्य संग्राम चालू असतानाच दुसऱ्या बाजूला ते हरिजनोध्दार, दारुबंदी, स्त्री शिक्षण, शांती, शिक्षण व्यवस्था, विश्वस्त संकल्पना यांविषयी विचारपूर्वक रचनात्मक कार्यक्रम आयोजित करीत होते. क्रांती करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना क्रांती कशी करावी याचे ज्ञान असते, पण क्रांतीनंतरची समाजरचना कशी असावी याचे भान नसते. गांधीजींना स्वातंत्र्यानंतरचा आपला समाज कसा असावा याचे स्पष्ट भान होते.

महात्मा गांधी यांनी त्यांच्या आयुष्यात तीन क्रांती केल्या असे एका समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा म्हणतात. (१) वंशद्वेषाविरुध्द, (२) वसाहतवादाविरुध्द, (३) हिंसेविरुध्द. दक्षिण आफ्रिकेतल्या अनुभवापासून धडा घेऊन गांधीजींनी या सर्वांच्याविरुध्द सर्वंकष लढा उभारला. शांततामय प्रतिकाराने या गोष्टी मोडून काढता येतात हे त्यांनी दाखवून दिले. गांधीजींमुळे सर्व जगाच्या चिंतनाला हे वळण लागले की अन्याय करणाऱ्याचा प्रतिकार करण्यापेक्षा प्रत्यक्ष अन्यायाचा प्रतिकार करा. तो अहिंसेने व प्रेमाने करा. डॉ. नेल्सन मंडेला यांनी गोऱ्या सत्ताधाऱ्यांशी गांधीमार्गानेच दीर्घकाळ लढा दिला व शेवटी वंशवादातून मुक्त झालेले एक स्वतंत्र राष्ट्र जन्माला आले,हा गांधीवादाचा विजय आहे.

Akshar Wangmay (International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

जोपर्यंत शस्त्रांचा व्यापार वाढत राहील तोपर्यंत जगभर हिंसेचे तांडव होतच राहणार आहे. हे गांधीजी जाणत होते कारण शस्त्राला विवेक नसतो. ते वापरणाऱ्या माणसाच्या दृष्टीने शेवटी विजय महत्वाचा असल्यामुळे तो विजयासाठी शस्त्र वापरणार. त्यामुळे अधिकाधिक शस्त्रस्पर्धा व अधिकाधिक संहारक अस्त्रे निर्माण होत गेली. गांधीजींचे मत असे होते की प्रत्येक राष्ट्राने आपली सेना ही कमी करावी व शस्त्रेही लढाऊ सैन्याच्या जागी शांतिसेना असावी. ती शस्त्राविरूध्द नि:शस्त्र उभी राहील. वेळप्रसंगी बंदुकींना, तोफांना निधडया छातीने तोंड देईल. दुर्देवाने अहिंसक सेनेची ही कल्पना जगाच्या पचनी पडली नाही. पण एक तटस्थ राष्ट्र म्हणुन आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताने शस्त्रे व सेना कमी करण्याचा मुद्‌दा लावून धरला. भारत आज मुख्यत: शांततावादी देश समजला जातो याचे मुळ गांधीजींच्या या तत्त्वज्ञानात आहे.

जगातल्या सर्व पातळीवर वाढणाऱ्या हिंसेला अहिंसा हे एकच उत्तर आहे. सत्य आणि अहिंसा ही गांधीजींच्या जीवनाची नियामक तत्वे होती. आजही जगभर होणाऱ्या हिंसेच्या विरोधात अहिंसक मार्गच योग्य मानले जातात.

१९६४ साली डॉ. मार्टिन ल्युथर किंगच्या चळवळीला शांततेचा नोबल पुरस्कार मिळाला. तो स्वीकारताना डॉ. मॉर्टिनने सांगितले की, ''आपल्या समोरच्या जटिल समस्या सोडविण्याचा अहिंसा हाच एकमेव मार्ग आहे.'' दडपशाही व हिंसा यांवर हिंसा व दडपशाहीचा अवलंब न करता मात करता येते. भारतीस जनतेचे अनुकरण करीत आम्ही युनायटेड स्टेट्सचे निग्रो असे मानतो आहोत की अहिंसा म्हणजे वांझ निष्क्रीयता नव्हे. समाज परिवर्तन घडविणारे ते सामर्थ्यशाली नैतिक तत्त्वज्ञान आहे.

वंशवादाविरूध्द गांधीजींच्या मार्गाने ज्यांनी संघर्ष केला ते डॉ. नेल्सन मंडेला दीर्घ काळ सत्ताधाऱ्यांच्या तुरूंगात होते. पण जेव्हा त्यांनी दक्षिण आफ्रिकेची घटना तयार केली तेव्हा गोऱ्यांना द्वेषबुध्दीने वागवले नाही. ते म्हणतात 'शातंतामय मार्गाचा आग्रह, द्वेषाऐवजी प्रेम भावनेचा स्वीकार, सर्व क्षेत्रांत समता आणि कष्टकऱ्यांना त्यांच्या मेहनतीचा उचित मोबदला हे सगळे मी गांधीजींपासून शिकलो.

Akshar Wangmay (International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

पैसा हाच पाश्चिमात्य संस्कृतीचा देव आहे. तो मिळविण्यासाठी या पृथ्वीचे जमेल तेवढे व जमेल तसे दहन करण्यात ही संस्कृती कचरत नाही. युरोपीय देशांबरोबर या स्पर्धेत आता जपान व अमेरिकाही उतरली आहे. या देशांनी जगापुढे ठेवलेले विकासाचे प्रारुप हेच खरे प्रारुप आहे हा एक मोठा भ्रम पसरविण्यात आला आहे. या विकासात मोठमोठी शहरे, चौपदरी रस्ते, मोठी धरणे, प्रचंड प्रमाणात खर्च होणारी वीज, सुखाची वाढती साधने, भव्य कारखाने, माणसांची कामे करणारी यंत्रे, स्वयंचलित वाहने, इत्यादींची रेलचेल आहे. पण दुसऱ्या बाजूला अर्ध्या जगात थैमान घालणारी भूक, नैसर्गिक साधनांचा विनाश, दारिद्रय, प्राथमिक गरजांची पूर्तता न होणे, हवेत, पाण्यात, भोजनसामग्रीत जंतूनाशकामुळे मिसळत जाणारे विष, ओझोनला पडलेले भगदाड, ॲसिडचा पाऊस, पृथ्वीचे वाढत जाणारे तापमान, वादळे, अवेळी पाऊस, दुष्काळ यांचे तांडव आहे. जे अर्थशास्त्र आपल्यावर लादण्यात आले आहे ते अर्थशास्त्र आहे की अनर्थशास्त्र याचा माणसाला थांगपत्ता लागत नाही. विकासाचे फायदे श्रीमंताच्या घरात पोहचत आहेत व तळागाळयातील माणसाला अन्नाला मोताद होण्याची वेळ येऊन ठेवली आहे.

पर्यावरणाचा जो भयंकर विनाश मानवाने केला त्याची किंमत जग चुकवतेच आहे. आमच्या विकासाची दिशा आम्ही ठरवू. आम्हाला, आमच्या राष्ट्राला जो परवडेल तो आमचा विकास. हे गांधीजींचे म्हणणे अगदी रास्त होते. गांधीजींच्या या विकासाच्या संकल्पनेत सर्वात शेवटी असलेल्या माणसाच्या किमान गरजा पूर्ण होणे म्हणजेच खरा विकास होणे होय. केवळ भौतिक विकास म्हणजे काही खरा विकास नव्हे. मानवाचे जीवन जेवढे नैतिक मूल्यांवर आधारलेले असेल तेवढे ते अधिक सार्थक समजले जाईल. गांधीजींनी विचारपूर्वक त्यासाठी शब्द वापरला होता 'सर्वोदय'. सर्वांचा उदय ज्या योगे होईल ते खरे स्वराज्य.

'मेरे सपनों का भारत' या आपल्या छोटयाशा पुस्तिकेत गांधीजी लिहितात ''ज्याप्रमाणे खऱ्या नीतिधर्मात आणि चांगल्या अर्थशास्त्रात विराधाभास नसतो त्याप्रमाणे खरे अर्थशास्त्र नीतिधर्माच्या उत्तुंग अशा आदर्शाच्याही विरोधात नसते. जे अर्थशास्त्र धनाची पूजा करण्यास शिकवते आणि सबळांना दुर्बळांचे शोषण करण्यासाठी धनसंग्रह करण्याची मुभा देते, त्यास शास्त्र म्हटले जाऊ शकत नाही. खरे अर्थशास्त्र सामाजिक न्यायाची पाठराखण करीत असते. ते समान भावनेने सर्वांच्या भल्यासाठी प्रयत्न करीत असते.

जगात आज अस्तित्वात असलेली समाजव्यवस्था सर्वार्थाने विषम आहे. मूठभर धनिक राष्ट्रे एका बाजूला व अर्धवट उपाशी, दारिद्रयाने गांजलेली, कर्जात बुडालेली, गरीब राष्टे दुसऱ्या बाजूला असे विभाजन स्पष्ट दिसते.

या विषमतेसोबतच शस्त्रास्त्रांची जीवघेणी स्पर्धा, सर्व क्षेत्रांत बोकाळलेला चंगळवाद, मानवाची किंमत शून्यापर्यंत येणे व संपत्तीची किंमत थेट आकाशाला भिडणे, नीतिमूल्ये, साधेपणा, सचोटी, परिश्रम, बंधुभाव, करूणा यांना जीवनात नगण्य स्थान लाभणे, वाढती यंत्राधिनता इत्यादी अनेक प्रश्न या सामाजिक व्यवस्थेपुढे आहेत.

या सर्वांवर गांधी तत्वज्ञान हे एकच उत्तर आहे असे म्हणणे कदाचित चूकिचे ठरेल. पण यातील बहूसंख्य प्रश्नांची उत्तरे गांधी तत्वज्ञानात मिळतात, कारण गांधी तत्वज्ञान हे प्रत्यक्ष प्रयोग व परिणाम यांवर आधारलेले वास्तववादी तत्वज्ञान आहे. जे—जे गांधीजींनी सांगितले ते—ते त्यांनी प्रत्यक्षात जीवनात उतरवून दाखविले.

महात्मा गांधी यांनी वंशद्वेष, वसाहतवाद आणि हिंसा या तीन मूलभूत समस्यांविरूध्द क्रांती घडवून आणली. जनतेला न्याय प्राप्त करून दिला. सैन्यावरील खर्च कमी करावा यासाठी गांधीजींनी शांतिसेनेची कल्पना राबविली. हिंसेला अहिंसा हेच उत्तर आहे असे गांधीजीनी सप्रमाण सिध्द केले. नेल्सन मंडेला यांनी गांधी तत्वांच्या आधारावरच लढा दिला.

पाश्चिमात्य संस्कृतीत अतिरेकी भौतिकवादामुळे पैशाला अवास्तव महत्व आहे. मोठमोठे कारखाने, उद्योगधंदे, प्रचंड नफा, गळेकापू स्पर्धा यांमुळे मानवी जीवन व पर्यावरण यावर विपरीत परिणाम झाला आहे.

आजच्या जगाला भेडसावणाऱ्या वरील विविध समस्यांवर गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन ते तत्वज्ञान अंगीकारून व प्रत्यक्षात वापर करून मात करू शकतो. मात्र त्यासाठी गांधी विचारांचा अभ्यास अंगीकारण्याचा निश्चय आणि प्रत्यक्षात गांधी विचार समजून घेवून अमलात आणण्याचा ठाम निश्चय करणे अत्यंत आवश्यक आहे. गांधी विचारांचा स्वीकार व त्यानुसार

Akshar Wangmay (International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

आचरण करणे ही केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात काळाची गरज ठरली आहे. म्हणूनच प्रचलित संदर्भात गांधीविचारांचे महत्व आपण लक्षात घेतले पाहीजे.

संदर्भ :

१) Aspects of Gandhian Thought/ Editor Himat Jheveri Mani Bhavan & Gandhi Sangrahalya.

२) Andrews C. (1949) Mahatma Gandhi's Ideas including selection from his writings, London, George alien and Unwin Ltd.

३) Chatterjee M. (1983), Gandhi's Religious thought, London, Macmillon Press.

४) वासंती सोट, एकविसाव्या शतकात गांधी, परंधार प्रकाशन.

५) डॉ. रामेश्वर भिसे, महात्मा गांधींचे तत्त्वज्ञान, प्रशांत पब्लिकेशन्स.

६) Dr. Sarvapalli Radhakrishan, Mahatma Gandhi, Jaico Publishing House.

७) धर्माधिकारी चंद्रशेखर, 'शोध गांधीचा', अक्षर प्रकाशन, मुंबई.

८) शहा मु. ब., 'गांधी विचार' य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक.

९) दाभोळकर देवदत्त अ., 'गांधीजींचे अर्थशास्त्र', महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे.

१०) Dr. Sarvapalli Radhakrishan, Mahatma Gandhi, Jaico Publishing House.